# जिल्हा परभणी आपत्कालीन व्यवस्थापन

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील दखखन पठारावर असलेल्या मराठवाडा विभागातील ८ जिल्हायापैकी परभणी एक जिल्हा आहे. हा जिल्हा महाराष्ट्रात पुर्वेस वसलेला आहे.जिल्हाचे क्षेत्रफळ ६५११चौ.कि.मी.आहे. जिल्हाची समुद्र सपाटीपासुन सर्वसाधारण उंची ४५७ मिटर आहे.जिल्हयातील खरीप हंगामातील मुख्य पिके ज्वारी,कापुस,मुग असुन रब्बी जवार,तुर गहु,भुईमुग करडी मुख्य पिके आहेत.
जिल्हयात एकुण ९ तालुके असुन महसुल मंडळांची संख्या ४०, तलाठी सज्जाची संख्या २३७,एकुण गांवाची संख्या ८५२ तर ग्रामपंचायतीची संख्या ७०४ अशी आहे. तालुका पालम वगळता जिल्हात ८ नगर पालिका अस्तीत्वात आहे.जिल्हयातील प्रमुख नदया गोदावरी नदी,दुधना नदी, पुर्णा नदी अशी आहे तर इंद्रायनी नाला,पिंपंळगढ नाला,बोरणा नदी,मासोळी नदी,वाण नदी, करपरा नदी,कसुरा नदी असे इतर नदया आहेत.जणगणना २००१ प्रमाणे जिल्हाची लोकसंख्या १५,२७,७१५. इतकी आहे.तालुकावार महिती खालील प्रमाणे आहे.

### सर्व साधारण माहिती

| अ.क्र | तालुका | गांव संख्या | नगर परिषद संख्या | ग्राम पंचायत संख्या | मंडळ | सज्जे | एकुण क्षेत्रफळ हेक्टर मध्ये | खरीपाचे लागवडी लायक सर्वसाधारण क्षेत्र हे.आर. | लोकसंख्या (जनगणना २००१ प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | **परभणी** | **१३२** | **१** | **११७** | **७** | **४६** | **११३५३२.४६** | **८६५००** | **४६०७७८** |
| २ | **पुर्णा** | **९५** | **१** | **७८** | **४** | **२८** | **६५१८१.८४** | **५८७००** | **१६२३०६** |
| ३ | **गंगाखेड** | **१०६** | **१** | **८४** | **३** | **२३** | **५१८३६.०८** | **४४३००** | **१६४०८०** |
| ४ | **पालम** | **८२** | **--** | **६७** | **२** | **१९** | **५०८८४.११** | **५४३००** | **६६७४८** |
| ५ | **सोनपेठ** | **६०** | **१** | **४२** | **२** | **१५** | **३५४७८.६१** | **३३३००** | **६६७४८** |
| ६ | **सेलु** | **९५** | **१** | **८२** | **३** | **२९** | **७२७०२.८१** | **५८५००** | **१३९३५२** |
| ७ | **मानवत** | **५४** | **१** | **४९** | **३** | **२०** | **४६८१६.५७** | **४४७००** | **९७०२४** |
| ८ | **पाथरी** | **५६** | **१** | **४९** | **२** | **१९** | **५७९६२.९८** | **४२४००** | **११०२१८** |
| ९ | **जिंतुर** | **१७२** | **१** | **१४५** | **५** | **३८** | **११९६६८.१६** | **८०२००** | **२३४४०५** |
| **एकुण** | | **८५२** | **८** | **७१३** | **३१** | **२३७** | **६१४०६३.६२** | **५०३०००** | **१५२७७१५** |

**भौगालिक स्थान व सीमाः**

महाराष्ट्र राज्याच्या नकाशात परभणी जिल्हा पुर्व भागात आहे.परभणी जिल्हयाच्या पूर्व दिशेस हिंगोली जिल्हा आहे. उत्तरेस जालना हा जिल्हा आहे. पश्चिम दिशेला बीड जिल्हा आहे तर दक्षिणेस लातुर जिल्हा आहे. परभणी जिल्हा १८.४५ते २०.०१ अंश उत्तर अक्षांश आणि ७६.१३ अंश ते ७७.२९ रेखांशावररेखांश स्थीत आहे.

**भौगोलिक रचनाः**

परभणी जिल्हा हा १८.४५ ते २०.०१ अंश उत्तर अक्षांश आणि ७६.१३ अंश ते ७७.२९ रेखांशावर वसलेला आहे. जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ ६५११ चौ.कि.मी. एवढे आहे. परभणी जिल्हाची समुद्र सपाटीपासुनची उंची सर्वसाधारणपणे ४५७ मिटर आहे. जिल्हाचा सर्वात उंच भाग जिल्हयाच्या पश्चिम दिशेला असलेल्या अजिंठा पर्वतात असुन त्याची उंची ५९७.७ मिटर एवढी आहे. परभणी जिल्हयाचे सर्वसाधारण पर्जन्यमान ७७४.५ मि.मि.एवढे असुन खरीप ज्वारी, कापुस, उडीद,आणि तुर तर रब्बी ज्वारी,गहु,हरभरा,व करडी ही प्रमुख पिके घेतली जातात.

**परभणी जिल्हयाचे हवामानः**

परभणी जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पावसाळयात दमट असते.उन्हाळयात तापमान जास्त असते ३८.० ते ४२.० डिग्री सेल्सेस तापमान असतो. परभणी जिल्हयात पावसाचे प्रमाण जास्त नसुन ४ते ५ वर्षातुन एकदा जास्त पावसाळा होतो. माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये जास्त पाऊस पडतो.

**प्रशासकीय विभाग**ः परभणी जिल्हा औरंगाबाद महसुली विभागात येत आहे. प्रशासकीय कामाच्या दृष्टीने (२) उप विभाग असून एकुण (९) तालुके आहे.

| अ.क्र. | उप विभाग | तहसिलचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| १. | परभणी | परभणी | | |
| २. | सेलु | सेलु | जिंतूर | |
| ३ | गंगाखेड | पुर्णा | गंगाखेड | पालम |
| ४ | पाथरी | पाथरी | सोनपेठ | मानवत |

१. महा नगर पालीका-०१
२. नगर पालीका-०७
३. पंचायत समिती-०९
४. ग्रामपंचायती-७१३

**जिल्हयातील पर्जन्यमानः**

विशिष्ट भौगालिक परिस्थितीमुळे अतिवृष्टीमुळे जिल्हयातील गोदावरी नदीला पावसाळयांत ४ते ५ वर्षातुन एक वेळेस पूर येतो. परभणी जिल्हयात जुलै-२००५, ऑगस्ट -२००६ मध्ये अतिवृष्टी होती. २००७ मध्ये ८०६.८ मि.मि.पाऊस पडला होता. अतिवृष्टी व येलदरी ,सिध्देश्वर धरणाचे पाणी गोदावरी नदीच्या पात्रात सोडल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली होती. जिल्हयात सरासरी पर्जन्यमान ७७४.५ मि.मि. पडतो. मागील १० वर्षाचा पडलेला सरासरी पाऊस खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | माहे जुन ते ऑक्टोबर पर्यंत प्रत्येक्ष पडलेला एकुण पाऊस (आकडे मि मि मध्ये) | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | १९९९ | ८८२.१ | ९८.०१ |
| २ | २००० | ९६४.१ | १०७.१२ |
| ३ | २००१ | ९९२.५ | ११०.२ |
| ४ | २००२ | ८७४.१ | ९७.१२ |
| ५ | २००३ | ८०५.८ | ८९.५३ |
| ६ | २००४ | ५५४.१ | ६१.५६ |
| ७ | २००५ | ११३०.२ | १२५.५७ |
| ८ | २००६ | ८४६.८ | ९४.०८ |
| ९ | २००७ | ८०६.८ | ८९.६४ |
| १० | २००८ | ५९१.९ | ६५.७६ |
| ११ | २००९ | ६१५.९ | ८०.० |
| १२ | २०१० | ९७४.७ | १२५.८४ |

**परभणी जिल्हातील प्रमुख नदयाः**

गोदावरी,दुधना,पुर्णा,या जिल्हयातील प्रमुख नदया आहेत. गोदावरी नदी जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरुन वाहते. गोदावरी या नदयांचा संगम पैठणच्या जायकवाडी धरणात येवुन मिळतो. त्याशिवाय जिल्हयात बोरना, मासोळी, वाण, करपरा,कसुरा, या उपनदया असुन याशिवाय इंद्रायनी आणि पिंपळगढ हे दोन मोठे नाले आहेत.

**महापूर येण्याची कारणे :**

जिल्हयाचा भाग हा पठारी असुन जिंतुर व पालम, गंगाखेड, या तालुक्यात लहान लहान डोंगर आहेत.या जिल्हयाचे पश्चिम भागातुन पुर्वेकडे नदया वाहतात.प्रामुख्याने या जिल्हयामध्ये गोदावरी नदी वाहत येते.या नदीवर औरंगाबाद जिल्हयात जायकवाडी धरण आहे. या नदीमध्ये नाशीक,अहमदनगर,औरंगाबाद,जालना,बिड,या जिल्हयातील पाणी समाविष्ट होते.याशिवाय दुधना नदी ही जालना जिल्हयातुन या जिल्हयात येते या नदीमधून औरंगाबाद चा उत्तरेकडील.भाग तसेच जालना या जिल्हयातील क्षेत्रामधुन या नदीस पाणी येते. करपरा नदीमध्ये जालना जिल्हातील मंठा,जालना जिल्हयाचा उत्तरेकडील भागाचे पाणी या नदीमधुन येते. या नदीवर येलदरी व सिध्देश्वर या दोन ठिकाणी मोठे धरण आहेत. मासोळी ही नदी बिड या जिल्हयामधुन येते. बिड चे पुर्वेकडील क्षेत्राचे पाणी या नदीमधुन या जिल्हयात येते. तसेच पैठण येथील जायकवाडी पाणी सोडल्यास गोदावरी नदीस पुर येते.

**जायकवाडी धरणात महापूर आल्यास विसर्ग सोडवण्याबाबतची क्षमता :**

जायकवाडी धरणाच्या सांडव्याची इंग्लीश फलडनुसार जास्तीत जास्त पुराचे पाणी सोडावयाची पुरक्षमता ६,४१,००० क्यूसेक्स इतकी आहे. महत्तम विसर्ग क्षमता ८,००,००० क्यूसेक्स इतकी आहे. त्यासाठी ५,००,००० क्यूसेक्स विसर्ग पैठण धरणाच्या सांडव्यावरुन गोदावरी नदी पाण्यात सोडल्यास गोदावरी नदीकाठच्या सात तालुक्यातील एकुण १११ गावांना त्याची क्षती धोका पहोचू शकतो.

**परभणी जिल्हयातील धरणे:**

**जिल्हयाच्या पुर परिस्थितीवर प्रभाव करणा-या जलाशयाच्या साठयाचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | धरणाचे/प्रकल्पाचे नांव | नदीचे नांव | धरणातील एकुण पाणी क्षमता | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण क्षमता | मृतसाठा | एकुण उपयुक्त क्षमता |
| १ | येलदरी धरण | पुर्णा नदी | ९२५.०० | १२४.०० | ८०१.०० |
| २ | सिध्देश्वर धरण | पुर्णा नदी | २५०.०० | १६९.०० | ८१.०० |
| ३ | माजलगांव धरण | माजलगांव धरण | ४५८.०० | १४६.०० | ३१२.०० |
| ४ | करपरा | करपरा | २८.८२० | ३.९२७ | २४.९०० |
| ५ | मासोळी | मासोळी नदी | ३४.०८१ | ६.९४० | २७.१४१ |
| ६ | जायकवाडी (पैठण) | गोदावरी | | | |
| ७ | पाटबंधारे लघु प्रकल्प(एकुण १) | | ४०.३१५ | ३.६२२ | ३६.६९३ |